**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यांच्या बैठक भत्त्यातील वाढ मंजूर करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन,
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक :सासंमं-१०११/ प्र.क्र.२८ /२०११/ भाषा-३
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक- २३ डिसेंबर, २०११

वाचा : १) शासन निर्णय क्र. मुविनि १०९५/प्र.क्र.१२/९५/विनियम,दि.१५ जून, १९९५
२) शासन निर्णय क्र.शासाउ १०९७/प्र.क्र. ६/०३/सा.उ, दि.२२ ऑगस्ट, २००३

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षांच्या व सदस्यांच्या सध्या देण्यात येत असलेल्या अनुक्रमे रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) , रु. १५०/-(रुपये एकशे पन्नास फक्त) या प्रतिबैठक भत्ताच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. विचाराअंती, या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षांना संदर्भ क्र.२ मधील तरतूदीनुसार अनुज्ञेय प्रतिबैठक बैठकभत्ता रु.३००/- याच दराने मंजूर करण्यात येत असून दोन्ही मंडळांच्या सदस्यांना सध्या देण्यात येत असलेल्या रु. १५०/- या प्रतिबैठक भत्ताच्या रकमेत वाढ करुन रु.३००/-(रुपये तीनशे फक्त) इतक्या प्रतिबैठक भत्त्याच्या रकमेस मंजूरी देण्यात येत आहे. वरीलप्रमाणे वाढीव प्रतिबैठक बैठकभत्त्याबाबत होणारा खर्च मंडळाच्या "मागणी क्र. झेड एफ ०२, २२०५ , कला व संस्कृती (००)१०२, कला व संस्कृती प्रचालन, ०१ योजनेतर योजना (०१)(०१) - १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. हा निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५६२/विनियम दि.८.१२.२०११ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

( संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६३५२३३२३३)

(किशोर रा.कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति ,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
२. अध्यक्ष, मुंबई महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ
३. सचिव , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
४. सचिव, मुंबई महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ
५. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई,
६. महालेखापाल, महाराष्ट्र २ (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
९. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा) , महाराष्ट्र , मुंबई
१०.वित्त विभाग (विनियम) मंत्रालय, मुंबई
११.निवड नस्ती /कार्यासन भाषा-२ / भाषा - ३